## नैसर्गिक वनस्पती

वनस्पती मौल्यवान नैसर्गिक साधन संपत्ती आहे. त्या त्या प्रदेशांमध्ये आपोआप किंवा नैसर्गिक रित्या वेगवेगळ्या वनस्पती उगवून येतात. वृक्ष, गवत, वाळवंटी झुडपे यांचा समावेश वनस्पती या संज्ञेखाली केला जातो. जेथे अनेक वृक्ष एकत्र वाढलेले असतात असा प्रदेश जंगल म्हणून ओळखला जातो. ज्या प्रदेशात इतर वनस्पती पेक्षा गवत जास्त आढळते तो प्रदेश गवताळ प्रदेश म्हणून ओळखला जातो. तर 25 सेंटीमीटर पेक्षा कमी पावसाच्या भागात काटेरी निवडुंग वनस्पती आढळून येतात. त्यांना वाळवंटी वनस्पती म्हणतात.

## नैसर्गिक वनस्पतीचे महत्व

वनस्पतीमुळे भूप्रदेशाचे सौंदर्य वाढते. हिरवा शालू नेसलेली धरती प्रसन्न मनमोहक असते. पर्यावरण शुद्धीसाठी जमिनीची धूप नियंत्रण करण्यासाठी, जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी, वनस्पतींच्या कुजलेल्या पाला पाचोळया पासून खत निर्माण करण्यासाठी, हवेत गारवा आद्रता टिकून ठेवण्यासाठी, पाने, फुले, लाकूड इत्यादींच्या उत्पादनासाठी वनस्पती आवश्यक असतात. वनामुळे पर्यटन स्थळे आरोग्यदामे रमणीय दिसतात. वनामुळे हवामान सौम्य राहते. पर्जन्याची प्रमाण वाढते. पावसाचे पाणी जमिनीत मुरते व भूमिगत पाण्याची पातळी उंचावते. वनस्पती पासून डिंक, लाख, मध, मसाले पदार्थ, औषधी द्रव्य, मिळतात. विवर थॉमसन यांच्या निरीक्षणानुसार भारतात पृथ्वीवरील जवळजवळ सर्व प्रकारच्या वनस्पतींच्या जाती आढळून येतात भारतात 176 वनस्पतींच्या जाती व 17000 वेगवेगळ्या वनस्पतींचे प्रकार पाहावयास मिळतात. नेत्याचे व शेवाळयाचे अनेक प्रकार आढळतात. त्याचबरोबर अनेक पक्षी व प्राणी पर्यावरण शुद्धतेच्या कार्यात मदत करीत असतात.

कोणत्याही प्रदेशातील नैसर्गिक वनस्पती या त्या प्रदेशाचे तापमान, पर्जन्यमान, मृदा व मानव या घटकावर अवलंबून असते. वनस्पतींच्या प्रकारावर व वाढीवर सर्वात जास्त प्रभाव हवामानाचा पडतो. भारतामध्ये हवामानात विविध असल्यामुळे वनस्पती प्रकारातही खूप विविध आढळून येते. तापमान पर्जन्यमान वायुभार हवेतील बाष्प, वारे या सर्वांनी मिळून बनलेली वातावरणाची स्थिती म्हणजे हवामान होय.

वनस्पती या 45° c पेक्षा कमी तापमानात जगू शकत नाहीत. म्हणजेच अतिउष्ण व अति थंड हवामानात वनस्पती आढळून येत नाहीत. वनस्पतींच्या वाढीला वीस ते 40°c तापमान पोषक असते. पाणी व सूर्यप्रकाश वनस्पतींच्या वाढीला आवश्यक असतो. जास्त पावसाच्या प्रदेशातील वनस्पती ह्या कमी पावसाच्या प्रदेशातील वनस्पती पेक्षा वेगळया असतात. उष्ण कटिबंधीय वनस्पती या समशीतोष्ण कटिबंधीय वनस्पती पेक्षा वेगळे असतात. वनस्पतींच्या वाढीसाठी उष्ण दमट आद्र हवामान पोषक असते. अधिक तापमान व अधिक पर्जन्यमान बाष्पीयुक्त आद्र हवामान असलेल्या भागात वनस्पतींची समृद्धी आढळते. बाष्पीभवन होण्याची क्रिया तापमानावर अवलंबून असते. त्यामुळे उष्ण कटिबंधात बाष्पीभवनाचा वेग जास्त असतो त्यामुळे 75 सें.मीटर पेक्षा अधिक पावसाच्या भागात वृक्ष वाढतात. उष्ण कटिबंधीय कायमस्वरूपी जंगलासाठी कमीत कमी 150 सेंटीमीटर पाऊस आवश्यक असतो. तर जेथे 100 सेंटीमीटर पेक्षा कमी पाऊस असतो तेथे विखुरलेले वृक्ष गवताचे क्षेत्र आढळते. समशीतोष्ण कटिबंधात हवेचे तापमान आणि

बाष्पीभवनाचा वेग कमी असल्यामुळे केवळ 35 सेंटिमीटर पाऊस सुद्धा वनस्पतींच्या वाढीला उपयोगी असतो.

## भारतातील वनस्पतींचे प्रकार व वनस्पतींचे वितरण

भारतातील वनस्पतींची विभागणी पुढील प्रमाणे केली जाते.

१) उष्ण कटिबंधीय दमट सदाहरित जंगले
२) उष्ण कटिबंधीय दमट निम सदाहरित जंगले
३) उष्ण कटिबंधीय आद्र व शुष्क पानझडी वृक्षांची जंगले
४) उष्ण कटिबंधीय काटेरी जंगले
५) हिमालयीन जंगले
६) दक्षिणेकडील डोंगरी जंगले

### १) उष्ण कटिबंधीय दमट सदाहरित जंगले-

ज्या प्रदेशात 250 सेंटिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडतो व जेथे तापमान 25 अंश ते 27 अंश से. असते व जिथे कोरडा ऋतू अल्पकाळाचा असतो अशा ठिकाणी ही जंगली आढळतात. येथील वृक्षांची पाने वर्षभर हिरवीगार दिसतात. म्हणून त्यांना सदाहरित जंगले म्हणतात. यांची पानगळ होत नाही.

**प्रदेश -** या जंगलाखाली पश्चिम घाटाचा पश्चिमेकडील उतार घाटमाथा भारताच्या ईशानेकडील भागातील अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, अंदमान निकोबार बेटे यांचा समावेश होतो. तसेच केरळची सायलेंट व्हॅली 8952 हेक्टर्स ही संपूर्ण आशियातील उल्लेखनीय अशी उष्ण कटिबंधीय आद्र सदाहरित घनगड जंगलांनी व्यापलेले आहे. बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडियाच्या मते ही जंगले अनुवंशिकता सिद्ध करणारी, औषधी वनस्पतीने समृद्ध मौल्यवान वृक्षांची राखीव जंगले आहेत.

### जंगलांची वैशिष्ट्ये-

१) उष्ण दमट हवामान हंगामी पण भरपूर पाऊस जमिनीत तुमचे प्रमाण जास्त त्यामुळे ही जंगली घनदाट वाढलेली सदैव हिरवीगार आहेत येथील वृक्षांची उंची 45 ते 60 मीटर पर्यंत असते सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी वृक्षांच्या मध्ये उंच वाढण्याची स्पर्धा चाललेली असते.

२) या प्रदेशात एकाच जागी अनेक प्रकारचे वृक्ष वाढतात त्यांना मिश्र जंगले म्हणतात. वृक्षांच्या फांद्या एकमेकांत मिसळलेले असतात. कमी उंचीचे वृक्ष ही त्यात वाढतात अनेक वृक्ष, असंख्य वेली, झूडपे यांची गर्दी झालेली असते. झाडांच्या पानांचे मोठे आच्छादन निर्माण झालेले असल्याने सूर्यप्रकाश जमिनीवर पोहोचू शकत नाही. दिवसा सुद्धा जमिनीवर झाडांच्या बुंध्याकडे अंधार असतो.

३) ही जंगली त्रिस्तरीय असतात

४) मेघालया चेरापुंजी मौसीनराम येथे जगातील सर्वाधिक पाऊस पडतो पण येथे जंगले नाहीत कारण या प्रदेशात मुसळधार पाऊस पडतो त्यामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप होते जमीन वनस्पतींच्या वाढीस योग्य राहत नाही.

**वृक्षांचे प्रकार-**

एबनी, महोगनी, चंपा, आयर्न वूड, रोजवूड इत्यादी वनांची तोड झालेल्या क्षेत्रात बांबू व ताडवृक्षही आढळून येतात. लाकडांचे मौल्यवान वृक्ष या जंगलात आढळतात रोजवूड पासून फर्निचर निर्मिती टून वृक्षापासून चहाची खोकी, खेळणी तर बांबूचा उपयोग कर्नाटकात दांडेली, भद्रावती येथे कागद निर्मितीसाठी केला जातो.

## २) उष्ण कटिबंधीय दमट निम सदाहरित जंगले-

जिथे 200 सेंटीमीटर च्या दरम्यान पाऊस पडतो व सरासरी तापमान 24° ते 27 अंश सें. असते तेथेही जंगले आढळतात.

**प्रदेश-**आसामचा उत्तर भाग, पश्चिम बंगालचा वायव्य भाग, उडीसाची किनारपट्टी, भारताची पश्चिम किनारपट्टी आंबोली, लोणावळा इत्यादी परिसर व अंदमान बेटे या भागात ही जंगले आढळतात.

**जंगलांची वैशिष्ट्ये-**

१) या जंगलात अनेक जातींची वृक्ष एकत्रपणे वाढतात त्यांना मिश्र जंगले म्हणतात.

२) वृक्षांची जाती कमी असली तरी जंगलात परबजीवी वनस्पती व वेली सर्वत्र आढळतात.

३) वृक्षांची लाकूड टणक टिकाऊ जड असते जंगलात बांबूचे प्रमाण कमी असते.

**वृक्षांचे प्रकार-**ऐन, कुसुम चंपा रोज रोड बीज साल कदम अंबा फणस जांभूळ पिवळा किंडल ताड वृक्ष लॉरेल बेंटिक हे या जंगलातील वृक्ष व्यापारी दृष्ट्या महत्त्वाच्या आहेत येथील लाकूड टणक जड असल्याने फर्निचर निर्मिती व जहाज बांधणी साठी रेल्वे स्लीपर्स व गलबते बोटी बनवण्यासाठी याचा वापर केला जातो.

## ३) उष्ण कटिबंधीय दमट व शुष्क पानझडी वृक्षांची जंगले.

या जंगलांना मान्सूनची जंगले म्हणतात. मान्सून पानझडी जंगलात कोरडा ऋतू दीर्घकाळाचा असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. पावसाळ्यात उपलब्ध होणारा पाण्याचा पुरवठा वर्षभर पुरेसा होत नाही. त्यामुळे कोरड्या ऋतूत मार्च ते मे या काळात सहा ते आठ आठवडे वनस्पतींचे बाष्पोत्सर्जन कमी व्हावे व वृक्षांच्या बुंध्यात पाणी टिकून राहावे म्हणून या कालावधीत वनस्पती आपली पाने गाळतात. म्हणून मान्सूनच्या जंगलांना पानझडी वनस्पतींची जंगले म्हणतात. नंतर पावसाळ्यात या वृक्षांना पाने फुटू लागतात पालवी फुटते व वृक्ष हिरवेगार दिसू लागतात वार्षिक सरासरी 100 ते 200 cm पाऊस असलेल्या प्रदेशात दमट पानझडी जंगले तर 100 ते 150 cm पावसाच्या प्रदेशात शुष्क पानझडी जंगले आढळतात सरासरी तापमान 26 अंश ते 27 अंश सें. असते. या जंगलांचे दोन प्रकार पडतात.

अ) आद्र पानझडी जंगली (100 ते 200 सेंटीमीटर पाऊस)

ब) शुष्क पानझडी जंगले.(100 ते 150 सेंटीमीटर पाऊस)

**अ) आद्र पानझडी जंगले-**(100 ते 200 सें.मी.पाऊस)

**प्रदेश-**ही जंगले पश्चिम घाटाच्या पूर्व उतारावर, भारतीय पठारी प्रदेशावर,( छोटा नागपूर पठारासह) हिमालयाच्या पायथ्याकडील भाबर, तराई डोंगर भागात, दख्खन पठाराच्या पूर्वेकडील डोंगराळ भागात, तामिळनाडूचा पूर्व घाट, केरळ,ओरिसा, कर्नाटक,

बिहार,पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड व गुजरातचा दमट हवामानाचा भाग अंदमान बेटे या ठिकाणी आढळतात.

**वैशिष्ट्ये-**१) वृक्षांची उंची 25 ते 60 मीटर असते रचना द्विस्तरीय असते.

२) वृक्षांची घनता मध्यम असते अधून मधून सदाहरित वृक्ष आढळतात.

३) साग, चंदन, साल हे यातील आर्थिक दृष्टीने मौल्यवान वृक्ष आहेत.

४) या जंगलामध्ये परोपजीवी वनस्पती व वेली अजिबात आढळत नाहीत.

५) या जंगलात बांबूचे अनेक प्रकार आढळतात.

**प्रमुख वृक्ष-**या जंगलातील साग हा आर्थिक दृष्ट्या प्रमुख वृक्ष आहे. सागाच्या मजबूतपणामुळे त्याला लाकडांचा राजा म्हणतात. त्याबरोबरच चंदन,शिसव, धावडा,अंजन,आवळा, आंबा, चिंच, जांभूळ, खैर, हिरडा, देवळा, लेंडी,कुसुम,किंडल, पिंपळ, पळस,सिरस इत्यादी प्रमुख वृक्ष या जंगलात आढळतात. या वृक्षांचे अल्लापल्ली (महाराष्ट्र चंद्रपूर जिल्हा) येथील आरण्य प्रसिद्ध आहे.टिकाऊ मजबूत टणक सागवान चे लाकूड फर्निचर,इमारती, जहाजे, रेल्वे डबे, यांच्यासाठी तर भुऱ्या रंगाचे सालाची लाकूड टिकाऊ असल्याने रेल्वे स्लीपर कोच, डबे, कृषी अवजारे,इमारतीसाठी, तर कर्नाटक व निलगिरी पठारावरील चंदन वृक्ष सुगंधी तेल, साबण, औषधे,शोभेच्या वस्तू तयार करण्यासाठी उपयोगात आणले जातात. बांबूपासून चटया तयार करतात.या जंगलातील व्यापारी दृष्ट्या महत्त्वाचे वृक्ष विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. शेतीसाठी अनेक ठिकाणी या जंगलातील वृक्षांची तोड मोठ्या प्रमाणात झालेली आहे.

**ब) शुष्क पानझडी जंगले-**(100 ते 150 सें.मी.पाऊस)

**प्रदेश-**हिमालयाच्या पायथ्यापासून दक्षिणेला कन्याकुमारी पर्यंत तुटक स्वरूपात 100 ते 150 सेंटीमीटर पावसाच्या प्रदेशात ही जंगले आढळून येतात. यामध्ये पंजाब, हरियाणा चा काही प्रदेश,थर वाळवंटाचा पूर्वेकडील भाग, उत्तर प्रदेशात गंगा नदीचे खोरे,मध्य प्रदेशात माळावा व विंध्य पर्वत, महाराष्ट्रात सातपुडा,अजिंठा डोंगर,विदर्भातील टेकड्या, तामिळनाडूचा पश्चिम भाग,आंध्र प्रदेशाचा मध्य व ओरिसाचा अंतर्गत भाग यांचा समावेश होतो.

**वैशिष्ट्ये-**१) या जंगलातील व्यापारी दृष्ट्या महत्त्वाचे वृक्ष विखुरलेल्या स्वरूपात आढळतात.

२) मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळे महत्त्वाचे वृक्ष दुर्मिळ होऊ लागलेले आहेत.

३) जंगलतोड करून ते क्षेत्र पिकांच्या लागवडीखाली आणलेले आहे.

४) या जंगलाचे सलग पट्टे आढळत नाहीत आदिवासी लोकांनी भटकी शेती केल्यामुळे वृक्षांचे प्रमाण फारच कमी झालेले आहे.

५) या प्रदेशात जंगलाबरोबर अधून मधून गवताळ प्रदेश आढळून येतात.

**प्रमुख वृक्ष-**या क्षेत्रातही दमट पानझडी जंगलातील वृक्ष आढळून येतात. येथील वृक्ष टणक, जड लाकडाचे त्यामुळे फर्निचर,इमारतीसाठी त्यांचा उपयोग होतो. या जंगलातील साग, साल, चंदन,शिसम,रोजवूड हे महत्त्वाचे वृक्ष आहेत. साग व साल यांचे लाकूड टिकाऊ मजबूत असल्याने ते इमारतीसाठी व फर्निचर साठी वापरतात तर खैरापासून कात तयार केला जातो.

### 4) उष्ण कटिबंधीय काटेरी जंगले-

अतिशय कमी पाऊस वार्षिक 50 ते 75 सेंटिमीटर पाऊस दीर्घकाळाचा कोरडा ऋतू व अल्पकाळाचा पावसाळा 25 अंश ते 27 अंश सेल्सिअस तापमान 47 टक्के पेक्षा कमीआद्रताअशी स्थिती ज्या प्रदेशात असते तेथे या प्रकारची जंगले आढळून येतात.

**प्रदेश-**पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात, कच्छ व त्या जवळील सौराष्ट्राच्या भागात,पंजाबच्या नैऋत्य भागात, हरियाणा व राजस्थानच्या पश्चिमेकडे व उत्तरेकडे तसेच गंगेच्या वरच्या मैदानी प्रदेशात उष्ण कटिबंधीय काटेरी जंगली आढळून येतात. राजस्थानच्या विस्तृत वाळवंटी प्रदेशात व द्विंकल्पीय पठाराच्या मध्यभागातील अवर्षण प्रवनक्षेत्रात ही जंगली जास्त प्रमाणात आढळतात.

**वैशिष्ट्ये-**१) या प्रदेशात पावसाचे प्रमाण 10 ते 50 सेंटीमीटर असते. सर्वत्र काटेरी वने खुरटी झुडपे व कुसळी गवत आढळून येते.

२) वाळवंटी शुष्क प्रदेशात काटेरी झुडपाबरोबर निवडुंगाचे अनेक प्रकार आढळून येतात.

३) या जंगलातील वृक्षांची झुडपांची पाने बारीक, मेणचट, तेलकट, असतात. काही वृक्षांच्या पानावर केस असतात, त्यामुळे पानाकडून बाष्पोत्सर्जन कमी होते.

४) वृक्षांच्या साली झाड असतात.

५) अनेक वृक्ष ना पानाऐवजी काटेच जास्त असतात.

६) झाडांची उंची कमी असते व त्यांची मुळे जमिनीत खोल गेलेले असतात.

७) काटेरी वृक्ष/ खुरट्या वनस्पती विखुरलेल्या स्वरूपात आढळतात.

**प्रमुख वृक्ष-**या जंगलात चिंच, खैर, बाभूळ, पळस,कडूलिंब, बोर,हिवर, नेपती शमी, शेर, तरवड,कोरफड,निवडुंग, घायपात व खुरटे गवत इत्यादी वनस्पती आढळून येतात. उत्तर भारतात खैर, मध्य भारतात बाभूळ, बोर,लिंब, पिंपळ, गंगेच्या खोऱ्यात गवत, व बांबू आढळून येतात.बाभळीच्या टणक लाकडापासून नांगर, बैलगाडी व इमारतीचे फर्निचर निर्माण करतात.बाभळीची साल व तरवडापासून कातडी कमावण्यासाठी टॅनिन निर्मिती केली जाते. खैरापासून कात तयार करतात. कडुलिंब,कोरफड या औषधी वनस्पती आहेत. घायपातापासून दोरखंड तयार करतात. काही झुडपांचे लाकूड इंधन म्हणून वापरले जाते.बाभळीपासून डिंक मिळतो. पाम व खजुराची झाडे वाळवंटात उपयुक्त आहेत.

### 5) हिमालयीन जंगले-

हिमालय पर्वतात उंचीनुसार तापमान कमी होत गेल्यामुळे पायथ्यापासून जास्त उंचीच्या शिखर भागापर्यंत वेगवेगळ्या प्रकारची जंगले आढळून येतात. हिमालयाच्या पश्चिमेकडील भागापेक्षा पूर्वेकडील पर्वतरांगांमध्ये जास्त पाऊस पडतो म्हणून हिमालयाच्या पूर्व व पश्चिम भागातील वनस्पतींमध्ये थोडा फरक आढळतो. हिमालयातील बहुतेक वृक्ष सूचीपर्णी वृक्ष आढळतात, हे सूचीपर्णी वृक्ष मऊ लाकडाचा असून कागद लगद्यासाठी त्याचा उपयोग होतो. बर्फ वितळून खाली जावे म्हणून या वृक्षांची पाने अनुकुचीदार असतात. पूर्व हिमालयात 1000 ते 2000 मीटर उंचीवर आद्र डोंगरी सदाहरित घनदाट जंगलात ओक, चेष्टनट, बीच, ॲस या वनस्पती तर पश्चिम हिमालयात त्याच उंचीवर चीर, ओक या वनस्पती आढळतात. संपूर्ण हिमालय पर्वतात 1500 ते 3300 मीटर उंचीवर 100 ते 200 cm पावसाच्या प्रदेशात सदाहरित ओक,चेष्टनर, लॉरेल,पाईन, सिल्वर फर, सिगार हे महत्त्वाचे वृक्ष आढळून

येतात. पश्चिम हिमालयात देवदार वृक्ष आढळतो. काश्मीर दरीत कोरबा येथे निळा पाईन आढळतो. अल्पाइन जंगले कमी उंचीच्या झुडपासारखी दिसतात. हिमालयात सुमारे 2800 ते 3600 मी.उंचीवर खुरटे सिल्वर फर, पाईन बर्च डेड्रोन हे वृक्ष आढळतात.यापेक्षा अधिक उंचीवर गवताळ प्रदेश व वर्षभर बर्फाच्छादित हिमोक्षेत्र आढळते.

**प्रमुख वृक्ष-**

ॲश, बीच, बर्च, चीर, चेस्टनट, फर, देवदार, सीडार, सिल्वर फर, पाईन इत्यादी वृक्ष आढळतात. हिमालयीन जंगलातील वृक्ष नरम लाकडाचे असून त्यांच्यात अनेक सूचिपर्णी वृक्षांचा समावेश होतो. या जंगलातील पाइन लाकडापासून खोकी, रेल्वे फळ्या, टेबल्स तयार करतात.ही झाडे उंच असतात त्यामुळे त्यांच्या फळयाही लांब असतात. भुऱ्या रंगाचे निळसर देवदार वृक्षाचे लाकूड तेलकट असल्याने फर्निचर इमारतीसाठी त्याचा वापर केला जातो.

### 6) दक्षिणेकडील डोंगरी जंगले-

भारताच्या पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात पळणी, कार्डमम,अनाईमलाई या डोंगरात व निलगिरी पर्वतात १०७० ते १५२५ मीटर उंचीच्या पट्ट्यात आद्र डोंगरी जंगले आढळून येतात. तसेच पंधराशे मीटर उंचीपेक्षा अधिक उंचीवर शेवाळे, नेचे या वनस्पतींची दाट जंगले आढळतात. त्यांना **शोला** म्हणतात. लॉरेल, ऱ्होडोडेड्रोन इत्यादी वनस्पती या जंगलात आढळून येतात.

**प्रमुख वृक्ष-**येथील जंगलात शेवाळे, नेचे, लॉरेन ऱ्होडोडेड्रोन इत्यादी वृक्ष आढळतात. या व्यतिरिक्त समुद्रकिनाऱ्यावरील दलदलीच्या प्रदेशात व त्रिभुज प्रदेशात 30 मीटर उंचीपर्यंत सुंदरी, मारांडी तसेच खारफुटीच्या जमिनीत मॅंग्रोव्हा वृक्ष आढळून येतात**.**

### वनसंवर्धन

भारतात विविध प्रकारच्या वृक्षांच्या सुमारे 5000 हून अधिक जाती असून त्यातील सुमारे 450 वृक्ष मौल्यवान आहेत. फळे,फुले, लाकूड, औषधी द्रव्य,वनस्पती पासून मिळतात. महाबळेश्वरच्या जंगलातून हिरडा, बेहडा, जांभूळ, या वनस्पती पासून मधमाशांचे पालन करून मध मिळवला जातो. तुतीच्या पानावर पोचल्या जाणाऱ्या रेशीम किड्यापासून नैसर्गिक रेशी मिळवले जाते.चिंच,लिंब, तुळस,आवळा, जांभूळ, निलगिरी, बेल,चंदन अशा अनेक औषधी वनस्पती, आंबा, फणस, नारळ, मोसंबी, संत्री, काजू असे विविध फळांचे वृक्ष, तर साग, साल, देवदार सारख्या फर्निचर व इमारतीला लाकूड मिळवून देणारे वृक्ष अशी खूप विविधता भारतातील वनस्पतीमध्ये आढळते.

देशात शेती उद्योगधंदे अनेक गोष्टींच्या विकासाच्या नावाखाली जंगलतोड मोठ्या प्रमाणात घडून आले आहे हे जंगल वाचवण्यासाठी पश्चिम घाट बचाव, चिपको आंदोलन चळवळ, सामाजिक वनीकरण, व फलोद्यान शेतीचे अनेक कार्यक्रम देशात सर्वत्र राबवले जात आहेत. भारतातील दरवर्षी होणारा वनक्षेत्राचा ऱ्हास 9लाख हेक्टर आहे, हे थांबवण्याकरिता अनेक स्वयंसेवी व शासकीय संस्थानी वृक्षारोपण व वन संवर्धनाच्या कार्यात सहभाग घेऊन आपला परिसर निसर्ग समृद्ध रमणीय हिरवागार बनवावा. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल साधला जाईल. जंगले तोडली तर प्रदेशाचे वाळवंटीकरण होते, पाण्याचा तुटवडा होतो, जंगलांच्या आधारावर आश्रयावर जगणारे अनेक पक्षी व प्राणी

जंगल तोडीमुळे नष्ट होऊ लागलेले आहेत. औषधी वनस्पती नष्ट होऊ लागले आहेत. मौल्यवान वृक्षांच्या जाती ही घटल्या आहेत. त्यामुळे कारखानदारीच्या विकासाच्या नावाखाली जंगलतोडीमुळे प्रदेशाची ओसाडी करण वाळवंटीकरण थांबवणे आवश्यक झाले. शासनाने 1986 साली पर्यावरण रक्षण कायदा लागू केला.सामाजिक चळवळीतून फळझाडे, फुलझाडे,औषधी व उपयुक्त वनस्पतींच्या लागवडीवर भर देण्यात आला.अनेक ठिकाणी रोपवाटिकामार्फत रोपे पुरवण्याचे कार्य सर्वत्र सुरू आहे. जंगले ही मानवाला उपकारक आहेत.याची महत्त्व देशातील जनतेला पटलेले आहे. त्यामुळे शिक्षण संस्था, विद्यार्थी, शिक्षक प्रशासकीय सेवेतील, व व्यापारी, उद्योग, वैद्यकीय, सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील लोकांनी परिसर समृद्धीसाठी व सौंदर्यासाठी पर्यावरण, समतोलासाठी आपल्या प्रदेशाचे हवामान आरोग्यदायी ठेवण्यासाठी वातावरणात आद्रता व गारवा टिकवून ठेवण्यासाठी, मातीची धूप नियंत्रित करण्यासाठी, प्राणवायू व कार्बन डायऑक्साइड वायू यांचा समतोल राखण्यासाठी, वृक्ष लागवडीला महत्त्व देणे व त्यासाठी प्रत्यक्ष कार्य करणे महत्त्वाचे आहे.

भारतातील 95% जंगले सरकारी मालकीचे आहेत. राखीव जंगलांचे प्रमाण 53% आहे संरक्षित जंगले 30 टक्के व अवर्गीकृत जंगले यांचे प्रमाण 17% आहे. शासनाने जंगल समृद्धीसाठी अनेक तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या व वन संशोधन संस्था स्थापन केले आहेत. वनसंवर्धनासाठी मिश्र जंगलांची समृद्धी सर्वत्र होणे आवश्यक आहे. पडीक, नापीक, डोंगर उताराच्या, मळरानावरच्या जमिनीवर तसेच ओढे, कालवे, रस्ते यांच्या दुतर्फा व रिकाम्या जागावर वृक्षांची लागवड करून निसर्गसमृद्धीत भर टाकणे आवश्यक आहे. सामाजिक वनीकरण, वनशेती, फलोद्यान विकास कार्यक्रम ही शासनाने वन विकासाच्या दृष्टीने चालवलेली पावले महत्त्वाचे आहेत. देशात सध्या 84 राष्ट्रीय उद्याने, 447 अभयारण्य आहेत. त्यांनी देशाचा 4.5% भाग व्यापला आहे. रिकाम्या जागी वनराई उभारणे प्रत्येकाचे नैसर्गिक कर्तव्य आहे. कारण झाडे आपल्याला जगण्यासाठी मोलाची मदत करतात.